जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७६ दिनांक - १२/०९/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा,पुणे शहर

**दिड वर्षापासुन पाहिजे असलेल्या खुनाच्या प्रयत्नातील आरोपीच्या आवळल्या मुसक्या**

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे गुन्हे अभिलेखावरील तसेच चतु:श्रुंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ५३/२०२३,भादंवि कलम ३०७,३२३,५०४,५०६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,आर्म ॲक्ट ४(२५), मुं.पो.का.३७(१)(३) सह १३५ या गुन्हयातील **दिड वर्षापासुन** पाहिजे आरोपी नामे **१) हरिष उर्फ हरि रविंद्र सावळे,वय २३ वर्षे,रा.ब्लुबेल सोसायटी शेजारील आकाश रणपिसे यांची पत्र्याची चाळ, जयहिंद चौक,सुतारवाडी, पाषाण,पुणे**, **२) सनी राजेश गुजराती, वय २२ वर्षे,रा.मुळपत्ता- खड्डा झोपडपट्टी,शिवाजीनगर,पुणे व सध्या रा.दत्तकृपा वॉशिंग सेंटर शेजारी,दांगट चाळ,सुतारवाडी,पाषाण,पुणे** यांचा दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील सपोनि प्रविण काळुखे व स्टाफ पो.हवा. प्रदीप राठोड, पोहवा बाळु गायकवाड, पोहवा गणेश ढगे, पो.अमंलदार अमित गद्रे,महेश पाटील व साईकुमार कारके असे शोध घेत असताना स्टाफमधील **पोलीस अमंलदार अमित गद्रे** यांना वरील गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे **१) हरिष उर्फ हरि रविंद्र सावळे** हा ओंकारेश्वर मंदीराजवळ मुठा नदीपात्रात, डेक्कन, पुणे व **२) सनी राजेश गुजराती** हा दांगट वॉशिंग सेंटर, पाषाण, पुणे येथे येणार असलेबाबतची गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली.

त्याप्रमाणे मा.वरिष्ठांच्या आदेशानुसार इकडील पथकाकडील सपोनि प्रविण काळुखे व वरील स्टाफ असे सापळा रचून **दिड वर्षापासुन वरील नमुद गुन्ह्यात पाहिजे असलेले आरोपी नामे १) हरिष उर्फ हरि रविंद्र सावळे, २) सनी राजेश गुजराती,** यांना शिताफीने पकडुन त्यांना ताब्यात घेतले व त्यांचेकडे चौकशी करता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे सांगितले. सदर आरोपींना पुढील कारवाईकरीता चतु:श्रुंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पुणे शहरचे मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर,श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे),श्री निखिल पिंगळे, मा.सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे १) श्री.गणेश इंगळे, व वरिष्ठ पोलीस निरीक्षक दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १ श्री.नंदकुमार बिडवई, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे, पोलीस अमंलदार अमित गद्रे, पोलीस हवालदार बाळु गायकवाड,प्रदीप राठोड, धनंजय ताजणे,गणेश ढगे,अजित शिंदे,गणेश गोसावी, महेश पाटील,साईकुमार कारके,रविंद्र लोखंडे,श्रीकांत दगडे,शिवाजी सातपुते,नारायण बनकर,मनिषा पुकाळे,दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी केली आहे.

